
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ........ काव्य
ं. क्र. २५८३

REFBK-0025755
REFBK-0025755

# मेघहृदय

वसंत बापट


मेघहृदय

साधना प्रकाशन
४३१ शनिवार पेठ
पुणे ३०



# मेघहृदय

## वसंत बापट

REFBK-0025755
REFBK-0025755







मेघहृदय

१९८८

© वसंत बापट


प्रकाशक : साधना प्रकाशन ४३१ शनिवार पेठ
पुणे ३०


मुद्रक : सुजित पटवर्धन मुद्रा ३८३ नारायण पेठ
पुणे ३०

मुखपृष्ठ, रचना आणि चित्रे : वासंती मुझुमदार




मराठी ग्रं० संग्रहालय ठा
वा. क्र.
काव्य





थेंबे थेंबे मधुर मदिरा सेवि जैसा विलासी
आस्वादावी तशिच रसिकें चित्कला कालिदासी
झाली काव्यें, कितिक असती, अन् पुढेही असोत
'याऐसें हे' सहृदय-मना मोहवी मेघदूत


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क.





१.


एक होता यक्ष
ज्याच्या क्षुल्लक अपराधासाठी
दिला त्याच्या संतप्त धन्यानं
वर्षभराच्या हद्दपारीचा कठोर शाप,
अन् आला नशिबी भोग प्रियाविरहाचा.
यक्ष राहू लागला दूर दक्षिणेत
रामगिरीच्या गुंफागृहांत.
अभाग्याला त्यातल्या त्यात हे भाग्यच...
इथे उमटली होती सीतारामांची पावलं,
मुक्त झाले होते
स्वच्छ शीतळ पाण्याचे झरे
त्यांत नाहणाऱ्या जानकीच्या स्पर्शानं.





२.

दिवसमास गेले दीर्घदीर्घ पावलांनी
आणि अचानक
आषाढाच्या पहिल्या दिवशी
समोर उभा ठाकला एक प्रचंड मेघ
डोंगरकड्याला धडक देणारा
मदमस्त हत्तीच जसा.
ये, घना ये,
घे ही कुड्याची रानफुलं
तुझ्या चाहुलीनं टवटवलेली.
ने माझा संदेश दूर अलकेपर्यंत
दे तो कशाबशा तगून राहिलेल्या प्रियेला
पालव तिची आशा पुनर्मिलनाची.



३.

हे पुष्करावर्तकांच्या कुलभूषणा
कामरूप मनोवेग दयाघना !
अनुकूल वाऱ्याच्या वारूवरून
जा दूर दूर उत्तरेला.
जा तुझ्या गतीनं, हवं तर रमत गमत,
सर्वांवर सुखाची बरसात करीत.
मार्गावरची गिरिशिखरं तुझ्या विसाव्याला.
मोरांचे आर्त टाहो तुझ्या स्वागताला.
फाळानं उखणलेल्या माळावर
उठतील सुगंधी वाफा
तुझ्या पहिल्यावहिल्या सरींच्या
उन्मादक स्पर्शानं.



४.

अहाहा, पहा पहा रे
पिक्या आमरायांनी सोनगहिरा केलेला
हा आम्रकूट पर्वत.
तू जेव्हा चढून बसशील त्याच्या माथ्यावर
तेव्हा सातव्या नभाच्या चंद्रशाळेतून
पृथ्वीकडे पाहणाऱ्या सिद्धगंधर्वांना
दिसेल त्या गंधवतीचं लावण्यमय यौवन.
हा पीतकेशरी उतारांचा डोंगर
आणि शिखरावर स्निग्ध श्यामल तू...
भूदेवतेच्या वर्तुळाकार गौर स्तनावर
तू शोभशील
जांभुळशार अग्रासारखा.



५.

असाच जात रहा तू
पुढे, पुढे आणि पुढेच.
जा निववीत पर्वतांचे माथे.
जा देत स्पर्शसुख कृश झालेल्या नद्यांना.
दे गारवा उन्हानं पोळलेल्या फुलमाळणींना.
दूर प्रवासाला गेलेल्या अभाग्यांच्या
संगमोत्सुक सहेल्यांना
दे तुझं सुखशीतळ आश्वासन.
आभाळात वाऱ्यानं उडवलेल्या डोंगरकड्यासारखा
झेपावशील ग्रामकन्यांच्या माथ्यावरून,
तेव्हा त्या भिवईवरच्या बटा उचलून
पाहतील तुझ्याकडे अपार कौतुकानं.



६.

या रसरशीत वेतसबनातून उड्डाण कर,
ठेव प्रस्थान उत्तरेला.
ते पहा इंद्रधनुष्याचं तोरण...
रत्नखचित कमानच उभारलेली जशी.
जा दिमाखात त्याच्या रंगांत न्हात.
हे श्याम घना
तेव्हा तू दिसशील घनश्यामासारखा.
तुझ्या सावळ्या देहावर
खुलतील इंद्रधनुष्याचे रंग.
गोपवेषधारी विष्णूच जसा
झळझळीत मोरपिसांनी
अधिकच कांतिमान झालेला.

७.

उत्तरेची ओढ लागून हे मेघमल्हारा
जेव्हा जाऊ लागशील द्रुत लयीत
तेव्हा दिसेल तुला नर्मदा...
विंध्यराजाच्या अंगावर पहुडलेली.
तुला आठवेल ऐरावताच्या अंगावरची
अनेकाग्र जायपत्री वेलपत्ती.
या रेवाप्रवाहात डुंबतात रानहत्ती
मिसळतो पाण्यात त्यांचा तीव्र मदगंध....
आणि ही प्रवाह थोपविणारी
जांभळीची गूढ गहन बेटं... तुरट गंध देणारी.
घे पिऊन पोटभर हे नर्मदेचं पाणी
मग वाऱ्याला जरा जडच जाईल तुला नेणं.

८.

मंद मंद वारा तुला अनुकूल असेल,
गोड गोड गाणारा चातक सोबतीला.
धरतील तुझ्याभोवती फेर
कामोत्सुक शुभ्र बलाकांच्या माळा.
अन् कधीही तुझी चुकू नये वाट
म्हणून खुणावतील हिरवे पिंगट
अर्धस्फुट परागांचे कदंब,
पाणथळीतल्या पसवलेल्या रानकेळी
आणि तूच शिंपलेल्या रानजमिनीचा
घमघमणारा सुगंध
कसकसून हुंगणारे हत्ती, हे काळवीट
सुचवतील तुला तुझा मार्ग.

९.

अ़ईनकिंजळांनी सुवासिक केलेल्या
प्रत्येक डोंगरावर तुझं आगमन होताच
तुझ्या स्वागतासाठी उंच आवाजात
मोर साद घालतील.
आकाशातून बघशीलच तू
त्यांचे धवल कोपऱ्यांचे सजल डोळे.
माझं प्रिय करण्यासाठी
तुला जायचं आहे लगबगीनं,
आणि त्यात हे स्वागताचे सोहाळे !
तरीही माझ्या मित्रा
करशील ना शक्य तेवढी खटपट
शक्य तेवढी घाई करण्याची ?






१०.

उपवनांच्या कुंपणावर उमलतात
हस्तिदंती केतकीची कणसं...
गावशिवेवरच्या काकस्थानी कलकलतात
कोठे करणारे कावळे...
रानं निळवंडून जातात
ठायी ठायी पिकलेल्या जांभळींनी...
तिथेच विसाव्याला टेकतात.
तुझ्यासह आलेल्या शुभ्र हंसमाला...
मित्रा, हे कृष्णधवल चित्र आहे
दशार्ण देशाचं,
ज्याची राजधानी आहे विख्यात विदिशा.
तिथे मिळेलच म्हणा तुला एक गोड फळ—




११.

— अरे इथेच आहे ती
चंचल लहरींची वेत्रवती.
तिच्या तटाला लगटून,
लटक्या रुसव्यानं शोभणाऱ्या मुखाचं
मनसोक्त चुंबन तू घेशीलच घेशील.
मग कधी फुलवशील
गुलटेकड्यांवरचे कदंब.
कधी अनुभवशील
गिरिगुंफातून उसासणारे
नागरिकांच्या चौर्यप्रणयाचे उग्र गंध.
रानझऱ्यांच्या काठांवरच्या रानजुईच्या जाळ्या
तुझ्या तुषारांनी फुलत राहतील.



१२.

आता हे खरं
तुला जायचंय उत्तरेला, तेही अविलंब,
तरीही जरा वाट वाकडी करून
उज्जयिनीच्या सौधांवर प्रेमानं झुलत रहा.
लवलवणाऱ्या विजेनं दिपलेले
तिथल्या सुंदरींचे भिरभिरणारे डोळे
न पाहणं म्हणजे फुकटच की हे जिणं !
जवळच उसळत्या लहरींची निर्विन्ध्या...
तिची ती नाचऱ्या पाखरांनी गुंफलेली मेखला,
अन् नखरेलपणानं दाखवलेला नाभीचा भोवरा...
तुला माहीतच आहे...असली लाडिक हालचाल
म्हणजे कामिनींचं पहिलं आमंत्रण !



१३.

अहा ती वैभवशाली विशाला
अवन्तिदेशाची विख्यात सुंदर राजधानी.
वृद्धांनी सांगितलेल्या दंतकथांनी
या नगरीचे कोन कोन भारलेले आहेत.
बहुधा झालं काय—
पुण्यक्षय झालेल्या स्वर्गस्थांनी
पुन्हा पृथ्वीवर जन्म घेताना आणला
एक स्वर्गखंडच उचलून.
हिच्या बाजारपेठांत दिसतील
दुनियेतील अगणित रत्नमोती.
समुद्र उरले आहेत केवळ जलनिधी...
आता कशाचे आलेत ते रत्नाकर !

१४.

सानंद सारसांचं अर्धस्फुट कूजन
दीर्घ करणारा हा शिप्रेवरचा वारा...
पहाटे पहाटे प्रफुल्ल कमळांच्या स्पर्शानं
सुवासिक होणारा हा शिप्रेवरचा वारा...
रतिक्रीडेनंतर रमणींचं थकलेलं अंग चेपणारा
गुलुगुलु बोलण्यात चतुर हा शिप्रेवरचा वारा...
तसंच, रमणींचे केस उदवून
चोरट्यासारखे जाळीदार गवाक्षांतून निसटणारे
हे धूपाचे फराटे...
हे मंदमधुर फुलांचे सुगंध...
आणि उन्मन होऊन नाचणारे हे गृहमयूर...
घे हे नजराणे, विसर तुझा थकवा.



१५.

सूर्य मावळतीच्या कडेला ढळल्यावरच
गंधवतीच्या तीरी बांध
महाकालाची सायंपूजा
गंभीर गर्जनेचा मादल वाजवीत—
*वाजव वाजव वाजव मेघा वाजव गंभीर भेरी*
*शिवशंकराच्या सांध्य पूजेसाठीं गर्जून आरती करी*
*नाही तो मंदिरीं, विश्वाला व्यापुनी उभा तो भुवनांगणीं*
*उंच उंच तरू हेच त्याचे भुज, हे रूप पाहिले कुणी ?*
*उंच भुजांवरी गजचर्मापरी धरील रुद्र तो तुला*
*संध्येच्या तेजाने लाज आणशील सतेज जास्वंदफुला*
*जेव्हा पशुपती थयथया नाचेल धरून चर्म हे ओले*
*तेव्हा तुजकडे पाहील भवानी लावुनी प्रशांत डोळे*



१६.

जेव्हा परतशील मंदिराकडून नगरीकडे
तेव्हा झाली असेल रात्र
तुझ्या आगमनामुळे अधिकच अंधारलेली.
निघाल्या असतील अभिसारिका
सजणांच्या भेटीसाठी काळोख्या राजमार्गांवरून.
कसोटीच्या पाषाणावरच्या सुवर्णाच्या रेघेइतपत
वीज लखलखू दे, केवळ त्यांना वाट दिसण्यापुरती.
करू नकोस गर्जना, आवर तुझी वृष्टी...
भितऱ्याच असतात रे त्या धिटकामिना !
निवांत रात्रीच्या प्रहरीं तूही घे विसावा
दीर्घकाल विलासानं थकलेल्या
तुझ्या बिजुरियाच्या संगतीत.

१७.

हलकेच जागवतील तुला ओल्या सूर्याची किरणं
तेव्हा मार्गस्थ हो माझ्या कामगिरीचं भान ठेवून.
वंचित रमणींची आसवं
हलक्या हातानं पुसायचा क्षण तो...
सूर्यालाही पुसायचे असतील
कमलिनीचे दंवभरले डोळे,
अशा वेळी त्याचे हात रोखशील तर
भलताच रागावेल ना तो !
मार्गावरती गंभीरेच्या प्रसन्न पाण्यात
तुझं प्रतिबिंब कसं अलगद उतरेल.
शुभ्र कमळांचे तिचे नेत्र...त्यांच्या कटाक्षांचे
मासे भिरभिरले तर दुर्लक्ष करू नकोस.

१८.

तिच्या पाण्याचं झुळझुळीत नील वसन
तिच्या कटितटांवरून घसरलेलं...
कसंबसं सावरून धरलेलं तिनं
आपल्या सडसडीत वेतस अंगुलींनी...
ते फेडल्यावर अचपळपणे
तू कसला हलणार मग तिथून !
मी समजू शकतो रे
तुझी अशा वेळी होणारी पंचाईत...
तशा सुखाला जो एकदा चटावला आहे
तो भाग्यवंत सराईत...
असा सहज अनावृत लाभ
कधी तरी सोडून जाऊ शकेल का ?

१९.

जलधारांच्या स्पर्शानं वाफारलेल्या मातीचा गंध
वारा मनसोक्त झोकून घेईल
आणि सोंडेनं फुर्रर फुर्रर करीत
हत्ती प्राशून घेतील त्या वाऱ्याला.
रानातली उंबरं पिकवणारा तो वारा
देवगिरीजवळ शीतळ झुळूक होऊन वाहील.
तूही बांध पूजा
देवगिरीवरील शिवपुत्र कुमाराची.
ढाळ त्याच्यावर फुलं
आकाशगंगेच्या पाण्यानं भिजवलेली.
देवसेनेच्या संरक्षणासाठी समूर्त झालेलं
शशिधराचं प्रखर तेज ते !



२०.

देवगिरीच्या गुंफांत दुमदुमणाऱ्या गर्जनेनं
तू नाचव कार्तिकेयाच्या मोराला.
शिवाच्या मस्तकावरील चंद्रकोरीच्या प्रकाशानं
अधिकच धवळले आहेत त्याचे नेत्रकोन.
तेजोरेषांची वर्तुळं असणारं त्याचं पीस,
आपल्या लाडक्या लेकावरच्या प्रेमामुळे,
साक्षात् भवानी धारण करते
कर्णफूल म्हणून !
कार्तिकेयाचं पूजन झाल्यानंतर
झपाट्यानं मार्ग आक्रमीत
तू जाशील चंबळेच्या भेटीला
अन् रेंगाळशील जरासा तिच्यापाशी..

ग्रंथालय ठाणे
२५८३
काव्य

२१.

....तू झुकशील तिच्या कृश भासणाऱ्या देहावर,
तेव्हा अरे सावळ्या,
पाहतील ते सुंदर दृश्य
आकाशमार्गानं जाणाऱ्या देवदेवता.
म्हणतील, पाहिला आम्ही एक मोतियांचा सर
मधे टपोरा नीलमणी गुंफलेला.
पुढे भेटेल तुला
लावण्यवतींनी गजबजलेलं दशपूर.
नटेल छटेल डोळ्यांच्या पापण्या त्या उचलतील
तुला अभिलाषेनं पाहण्यासाठी.
आठवेल तुला तेव्हा
कुंदफुलांवर रुंजी घालणाऱ्या भ्रमरांची शोभा.

२२.

मग जा पवित्र ब्रह्मावर्तात, कुरुक्षेत्राला.
घे पिऊन सरस्वतीचं पवित्र पाणी.
काय सांगू त्या पाण्याची मात...
रेवतीच्या गालावर गाल ठेवून
तिच्या डोळ्यांचं प्रतिबिंब पडलेली मदिरा
म्हणजे बलरामाची कोण आवडती वस्तू !
पण तिचाही त्याग करून
सरस्वती-जल पिऊ लागला तो हलधर !
तूही ते जरूर प्राशन कर...
मग तुझा देह काळ्या रंगाचा असला तरी
अंतर्यामीं होशील तू
स्फटिकासारखा धवल... शुचिर्भूत !

२३.

पुढे तर काय ! कनखल क्षेत्राजवळ
पर्वतराज हिमालयाच्या पायऱ्या दुडदुड उतरून
खाली आल्यावर
सगरपुत्रांच्या उध्दारासाठी
पुन्हा स्वर्गसोपान रचणारी भागीरथी
तुला दर्शन देईल.
या जान्हवीनं शिवाच्या मस्तकी बसून
आपल्या लहरींचे हात
चंद्रशेखराच्या जटेवरील चंद्राला भिडवले
अन् रागावलेल्या गौरीच्या भाळीं
मत्सरानं भिवया मुरडलेल्या पाहून
धवल फेसाच्या रूपानं ती फक्त हसली !

२४.

गंगाप्रवाहावर तरंगत राहून
घे पिऊन तिचं स्फटिकनिर्मळ पाणी.
मात्र झुकशील
तो साक्षात् ऐरावतासारखा झूक.
पुच्छभाग राहू दे आकाशात.
सरकत राहील तुझी सावली
तिच्या शुभ्र प्रवाहावर...
ते दृश्य पाहिल्यावर वाटेल
अहाहा काय हे सौंदर्य...
पण असा कसा झाला
भलत्याच ठिकाणी
सावळ्या यमुनेशी गंगेचा संगम !



२५.

जिथे गंगा उगम पावते
त्या हिमधवल पर्वतांच्या प्रदेशात
तुझा प्रवेश होईल तेव्हा पाहशील
तिथल्या शिला शिला सुगंधित असतात
त्यांच्यावर विसावलेल्या कस्तुरीमृगांच्या नाभिगंधानं.
वाटचालीचा शिणवटा दूर करण्यासाठी
तू जेव्हा टेकशील एखाद्या शिखरावर
तेव्हा कसा दिसशील, सांगू ?
त्रिलोचन शिवाच्या नंदीनं
खेळता खेळता खणून
सहज शिंगावर घेतलेल्या
चिखलाच्या लपक्यासारखा.



२६.


उंच सरळ देवदारांच्या घर्षणानं
जर तिथे उफाळले वणवे,
जाळू लागले वनगाईंच्या झुबकेदार शेपट्या,
लावू लागले धग त्या पर्वताला,
तर आपल्या हजारो जलधारांनी
विझवून टाक ते वणवे.
गारांचा तुमुल मारा करून
उधळून लाव अंगावर आलेले शरभ.
वेळूबनात बासरी वाजवणाऱ्या वाऱ्याच्या साथीनं
किन्नरी गातील त्रिपुरविजयाची गाणी...
तेव्हा तुझ्या दुमदुमणाऱ्या गर्जनेचा मृदंग वाजव
त्यांची साथसंगत करायला.


२७.

हे आणि ते पहात जाशील तेव्हा
उत्तर सीमेवरच्या त्या महाकाय तटात
तुला दिसेल क्रौंचरंध्र नामक सुरंगी...
हंसांची वहिवाटीची वाट...
परशुरामाच्या बाणानं खोदली आहे ती.
तूही सर आता उत्तरेला त्याच वाटेनं.
जेव्हा त्यासाठी पसरशील तुझा लांबुटका देह
तेव्हा असा शोभू लागशील—
जसा काही विष्णूनं
बळीला पाताळात दडपण्यासाठी
आकाशात उंच उचलला आहे
आपला श्यामल चरण.

२८.

पलीकडे आहे कैलास...
शिवाचं लक्ष वेधून घेण्यासाठी
दशमुख रावणाच्या वीस भुजांनी
त्याचे सांधे खिळखिळे केले होते.
कैलास !
देवांगनांचा लखलखीत आरसाच जसा.
रातकमळांसारखी शुभ्र आहेत
त्याची गगनगामी शिखरं.
हा पर्वत कसला...ही तर आहे
दिवसानुदिवस साठत गेलेली
शिवशंकराच्या लखलख हास्याची
प्रचंड रास !





२९.

तुझं काजळकाळं झळझळीत रूपडं
जेव्हा विसावेल कैलासाच्या उतरणीवर
तेव्हा, कातलेल्या हस्तिदंताच्या गाभ्यासारखा
तो गौरांग कैलास दिसू लागेल
निळं उत्तरीय खांद्यावर टाकलेल्या बलरामाप्रमाणे.
कैलास ! शिवपार्वतींच्या विहाराचा पर्वत !
गौरीवरच्या प्रेमामुळे, आपलं सर्पकंकण भिरकावून
दिला असेल शिवानं तिला हात.
तेव्हा तुझं पाणी आतल्या आत गोठवून
त्या रत्नखचित तटावर
तू तुझा देहसोपानच पुढे कर
त्यांच्या विहारसुखासाठी.

३०.

आपल्या रत्नकंकणांच्या कंगोऱ्यांनी
तुझ्या देहाचं हजारं करणाऱ्या अप्सरा
तुला छळू लागल्या
तर भिवव त्या अल्लडिकांना
आपल्या कठोर गर्जनांनी.
सोनकमळं फुलवणाऱ्या 'मानसा'चं पाणी पी.
ऐरावताच्या मस्तकावर
तुझी छत्रच्छाया धर,
कल्पवृक्षांच्या रेशिमपालवीला
मंद झुळुकांनी झुलव...
अशा विविध चाळ्यांनी सुखवत रहा तू
त्या नगाधिराजाला.

३१.

पाहताक्षणी ओळखशील तू अलकेला.
कैलासाच्या... तिच्या प्रियकराच्या... मांडीवर
पहा कशी रेलली आहे ती !
अशा प्रेमिकेला नसतं उरलेलं
देहावरच्या वस्त्राचं भान.
पहा कशी गंगा ढळली आहे
तिच्या स्कंधावरून !
आता वर्षाकाळीं, आपल्या उंच हवेल्यांवर
ती धारण करील सजल अभ्रपुंज
जशी माळावी कामिनीनं
मोत्यांची जाळी
आपल्या विपुल केशसंभारावर.

३२.

मित्रा, तुझ्यासारखेच आहेत अलकेतले प्रासाद,
त्यांत वावरतात विजेसारख्या सुंदर ललना.
रंग इंद्रधनुष्यांचे आहेत या प्रासादांचे.
मेघगर्जनेसारखे वाजतात मृदंग संगीत-रंगात.
शुद्ध जळासारख्या स्फटिकांची फरसबंदी.
तुझ्यासारखे तेही असतात गगनाला भिडलेले !
काय सांगू तिथल्या सुंदरींची पुष्पसज्जा...
हातीं लीलाकमळ. केसांत माळलेल्या कुंदकळ्या.
गालांचं गोरेपण लोध्राच्या परागांनी वाढवलेलं.
केसांच्या फणेवर ताजे कोरांटीचे घोस.
कानावर शिरीष आणि भांगातून झुकणारं
कदंबाचं फूल, तुझ्या आगमनाचा घोष करणारं.

३३.

अहा ! ते सदाप्रफुल्ल वृक्ष  आणि ते भ्रमरांचं गुंजन.
त्या कमलखचित कमलिनी
ज्यांना खुलवतात हंसमालांच्या मेखला.
सदैव लकाकत्या पिसाऱ्यांचे मोर, त्यांच्या हाका
आणि त्या न मावळत्या चांदण्यानं
बारामास धवळलेल्या पुनवेच्या रात्री.
यक्षांच्या डोळ्यांत पाणी उभं राहतं, ते आनंदानंच.
त्यांना ताप फक्त मदनाचा
जो सहज उतरतो, प्रियामिलनानं.
विरह होतो, तो प्रेमकलहानं.
अरे, त्यांना वय असतं एकच,
उत्फुल्ल तारुण्य!

३४.

सौधांच्या माथ्यावर शुभ्र स्फटिकांची भूमी...
तिच्यावर फुलतात तारकांच्या प्रतिबिंबांची फुलं.
मेघमंद्र मृदंगांच्या तालावर
झुलत झुलत चवीनं झोकतात यक्ष
कल्पवृक्षांनी दिलेली मदिरा
जिचा परिणाम एकच... बेहोश रती !
निरी फिटून जेव्हा सैलावतं रेशमी वसन
आणि ते खेचतात प्रणयी प्रियकरांचे धटिंगण हात,
तेव्हा फेकतात अलकेतल्या सलज्ज रमणी
चंदनचुऱ्याच्या मुठी रत्नदीपांवर.
रत्नदीप थोडेच विझणार असल्या अस्त्रांनी !



३५.

उंच उंच प्रासादांच्या अत्युच्च मजल्यावर
सहज पोचतात तुझ्यासारखे मेघ
अनुकूल वाऱ्यानं वाहून नेलेले.
त्यांच्या तुषारांच्या स्पर्शानं जेव्हा बिघडतात
भिंतीवरच्या चित्रांचे रंग
तेव्हा ते सटकतात गवाक्षातून
धुराच्या फराट्यांचं सोंग घेऊन.
कधी मेघांचा पडदा हटतो
आणि उजळतात चंद्रकिरण...
तेव्हा पाझरू लागतात चंद्रकांत मण्यांच्या जाळ्या,
प्रियकरांच्या गळामिठीतून अमळ सुटलेल्या सुंदरींना
देतात गारवा, शीणभाग हरवणारा.

३६.

जातात कामी प्रणयिनी रात्री
प्रियकरांच्या गुपचुप भेटीसाठी अन्
सूर्य उगवला की उघड होतात वाटेवरच्या खुणा...
लगबगीमुळे केसांतून ओघळलेली मंदाराची फुलं,
कातरलेल्या पानांची भूषणं,
अन् कानांवरून गळून पडलेली सोनकमळं.
तसेच ते धागे तुटून विखुरलेले
वक्षांवरचे हार, माथ्यांवरील मोत्यांच्या जाळ्या.
घरात गडगंज ऐश्वर्य...
मग काय नवल, अलकेतले प्रणयी युवक
कानगूज करीत राहतात अष्टौप्रहर
तिथल्या चटकचांदण्यांशी.

३७.

जिथे कुबेराचा मित्र शंकर राहतो
तिथे कुठून खेचणार मदन आपलं धनुष्य ?
ते काम होतं चतुर कामिनींच्या
कटाक्षांच्या तिरकस तिरांनी !
तसाच तो कल्पवृक्ष...
एकटाच पुरवतो बेटा
रंगबिरंगी वस्त्रे अन् हर तऱ्हेचे अलंकार,
डोळे उडवायला शिकवणारी मदिरा,
कोवळ्या पालवीसह उमललेले फुलगेंद,
कमळकळ्यांसारखी पावलं रंगवायला योग्य
असा लालचुटुक अळता,
सारे चोचले, सारी प्रसाधनं !




३८.

आमच्या प्रासादाची खूण सांगतो...
तो आहे कुबेराच्या राजवाड्याच्या उत्तरेला.
इंद्रधनुष्यासारखं दारांत सुंदर तोरण आहे.
आणि हो... त्याच्या जवळच आहे
एक अटकर मंदार वृक्ष,
हातांनी घोस खुडावे असा बेतशीर.
माझ्या प्रियेनं मुलासारखा वाढवलाय त्याला.
अंगणात पाचूच्या पायऱ्यांची एक पुष्करिणी.
तिच्यात प्रफुल्ल सोनकमळं, रत्नांच्या देठांची.
आणि बरं का, मानस जवळ असूनही
आणि तुझ्यासारखे मेघ पाहिले तरीही
तिथले हंस आमच्या पुष्करिणीतच राहणार !

३९.

तिच्या तीरावर आमची इटुक-टेकडी आहे...
शिखर नीलमण्यांचं आणि सर्व बाजूंनी सोनकेळी.
तुझ्या बाजूला वीज लवताना पाहतो तेव्हा
माझ्या लाडकीची ती आवडती टेकडी आठवते
अन् मनाचा थरकाप होऊन जातो.
जवळच आहे जाईचा मांडव
त्याला कोरांटीचं कुंपण आहे बघ.
त्याला लागून झिळमिळत्या पालवीचा लाल अशोक
आणि सुरेख बकुळीचा वृक्ष.
अशोकाला हौस तुझ्या सखीच्या डाव्या चरणप्रहाराची
आणि बकुळवृक्षाला तहान
तिच्या मुखातील मदिरेची चूळ लाभावी म्हणून.






४०.

तिथेच आहे आमच्या मोरासाठी सोन्याची दांडी
तिच्या मुळाशी चमकदार पाचू आहेत
हिरव्या कळकांच्या कोमल रंगाचे.
वर स्फटिकाची फळी.
माझी प्रिया किणकिणत्या काकणांच्या तालावर
मोराला नाचायला लावते
अन् मग ढळत्या सायंकाळी
तो नीलकंठ दांडीवर गुडुप होतो.
आमच्या प्रवेशद्वारापाशी आहेत 'शंख' आणि 'पद्म'
ओळखशीलच तू आमचं घर, या खुणांमुळे.
अर्थात् एक आहे,
मी नसल्यामुळे घराची रया जरा उतरलेली असेल !


४१.

तू घे गोजिरवाण्या हत्तीच्या छाव्याचा आकार,
उतर चटदिशी, टेक जरासा क्रीडापर्वतावर.
मग काजव्यांची रांग लुकलुकते ना
तशा विजेच्या मंद उजेडात बघ आत डोकावून.





दिसेल तुला माझं दुसरं हृदयच
अशी ती मितभाषिणी विरहिणी...
तिचे दात सुरेख, ओठ लालचुटुक
अन् नजर भ्यालेल्या हरिणीची.
ती बारीक कमर अन् खोल नाभी...
शेलाटी अंगकाठी ऐन भरातली.
नितंबभारानं मंदगामिनी, वक्षभारानं जरा झुकलेली.
जशी काही ब्रह्म्यानं घडवलेली
स्त्री-सौंदर्याची पहिली पुतळीच !




४२.

कशी सोसत असेल ती पोर
या वियोगदीर्घ दिवसांच्या वेदना ?
दिसत असेल थंडीनं झोडपलेल्या कमळवेलीसारखी.
रडून सुजलेले डोळे
आणि उष्ण निःश्वासांनी रंगहीन झालेले ओठ...
टेकलं असेल तिनं आपलं मुख तळहातावर,
रुळत असतील मोकळ्या कुरळ्या केसांच्या बटा
तिच्या फिकट मुखावर.
तुझ्या आवरणाखाली
चंद्रमुख झाकोळून जातं ना,
तसा उदासवाणेपणा आला असेल
त्या मुखचंद्रावर.

४३.

ती तुला दिसेल पूजेमध्ये गढलेली.
किंवा रेखीत असेल माझी प्रतिमा
मी विरहानं वाळलो असेन अशी कल्पना करून.
किंवा विचारत असेल
पिंजऱ्यामधल्या गोडबोल्या मैनेला पुन्हा पुन्हा :
'अग रसिके, येते का स्वामींची आठवण ?
फार लाडकी ना तू त्यांची ?'
किंवा कदाचित् मळकट वस्त्र नेसलेली ती
मांडीवर वीणा घेऊन
गात असेल माझं नाव गुंफलेलं गीत.
भिजत असतील तारा ओघळणाऱ्या आसवांनी
आणि विसरत असेल ती आपणच रचलेली बंदीश.



४४.

कधी मोजत असेल विरहाचे उरलेले दिवसमास,
उंबऱ्यावरची फुलं भुईवर मोजून ठेवीत.
किंवा कल्पनेनंच अनुभवत असेल माझा सहवास...
प्रियकर जवळ नसताना
हेच तर असतात स्त्रियांचे विरंगुळे.
दिवसा विरहदुःखाचं फारसं काही नाही रे,
पण रात्री नसतो दुःखाला पारावार.
मध्यरात्री ती जागत पडली असेल भुईवर
अशा वेळीच भेट तिला
महालाच्या गवाक्षात बसून.
तू जेव्हा देशील खुशालीचा निरोप
तेव्हा मोहरून जाईल ती आनंदाने.

४५.

झुरणीला लागून कृश झालेली माझी प्रिया
टेकली असेल विरहशेजेच्या कडेवर,
तेव्हा दिसेल ती कलामात्र उरलेल्या
पूर्व क्षितिजावरच्या चंद्रकोरीसारखी.
कुठे ती माझ्या सहवासात
सुखाची लयलूट करीत घालवलेली
क्षणासारखी वाटणारी रात्र...
आणि आता तीच रात्र
झाली असेल दीर्घ, दीर्घ, दीर्घ.
ऊन ऊन आसवं गाळून
कंठायची कशीबशी कंटाळवाणी यामिनी
विरहानं वैरीण केलेली !

४६.

कोरड्या स्नानानं भरभरीत झालेले
गालांवर लोंबणारे, विस्कटलेले केस...
ते भुरभुरत असतील
ओठांची पालवी करपवणाऱ्या तिच्या निःश्वासांनी.
स्वप्नात तरी माझा समागम व्हावा
यासाठी तिला हवी आहे झोप.
पण आसूभरले डोळे झाकावे तरी कसे ?
सारे साजशृंगार तिनं सोडले आहेत.
दुःखव्याकुळ मनानं कशीबशी पहुडलेली ती
आसू उभे करील तुझ्याही डोळ्यांत.
आधीच आर्द्र ज्याचं अंतःकरण,
ते करुणेनं कसं रे होत असेल !

४७.

मी बोलतो आहे त्या त्या गोष्टीची प्रचिती
घेशीलच तू प्रत्यक्ष.
झुकलेल्या बटांमुळे कटाक्ष रोखलेले असतील...
नसेल डोळ्यांत काजळ...
मधुपानच नाही, तिथे भ्रूविलासही कसले !
तरीही तुझ्या दर्शनानं
जेव्हा लवेल त्या मृगनयनेचा डावा डोळा,
तेव्हा दिसेल तुला
मासोळ्या हलल्यामुळे डुलू लागलेल्या
नीलकमलाचं सौंदर्य...
या शकुनासह स्फुरण पावेल तिची डावी मांडी
केळीच्या रसाळ खांबासारखी, गोरीपान.





४८.

हे मेघराजा,
लागलाच असेल तिचा डोळा जरासा
तर थोडीफार वाट पहा.
नाही तर तुझ्या गडगडाटानं
गळून पडेल ना तिची घट्ट गळामिठी
स्वप्नात मला आलिंगन देतेवेळची.
हलकेहलके उठव तिला
तुषारांनी शीतळ झालेल्या झुळुकेनं.
मग नव्या बहराच्या चमेलीच्या कळ्यांसह
येईल तिला जाग.
तुझी वीज आतल्या आतच ठेवून
बोल त्या मानिनीशी गंभीर शब्दांनी.

४९.

—'हे भाग्यवती,
मी आहे, तुझ्या स्वामीचा जिवलग सखा.
मी आहे प्रवासी विरही जनांचा आश्वासक...
देतो त्यांना प्रेरणा प्रियामिलनाची.
आज आणला आहे मी तुझ्या पतीचा संदेश...'
—एवढं ऐकल्यावर ती पाहील तुझ्याकडे
औत्सुक्यानं फुलून, मुख उंचावून,
जसं पाहिलं असेल सीतेनं... हनुमंताकडे.
म्हणशील ही नजरच म्हणते आहे, सुस्वागतम्.
नसली होत प्रियकराची भेट
तर निदान त्याची कुशल वार्ता...
जवळजवळ प्रत्यक्ष भेटीसारखीच की !

५०.

तू सांग तिला...
म्हणावं, तुझा पती रामगिरीवर कुशल आहे.
सोसतो आहे धीरानं आपलं एकाकीपण.
तुझंही कुशल पुसलं आहे त्यानं.
तो पाहतो आहे दिवास्वप्नं, करतो आहे मनोरथ,
आपल्या सुकल्या देहानं
तुझ्या सुकुमार देहाला आलिंगन देण्याचे.
पूर्वी शब्दानं सांगावा असा संदेशही
तुझ्या मैत्रिणींच्या समोर जो कानात सांगायचा
तुझ्या मुखस्पर्शाच्या लोभानं,
तो सांगतो आहे तुला निरोप
डोळ्यांच्या अन् कानांच्या टप्प्याबाहेरून !

५१.

मी पाहतो तुला प्रियंगु लतेच्या रूपात,
मी पाहतो तुझ्या नजरेची फेक
हरिणींच्या भिरभिरत्या डोळ्यांत,
चंद्राच्या ठायीं बघतो तुझ्या मुखाची कांती,
मोरपिसारे पाहताच आठवतो तुझा केशकलाप,
दिसतात नद्यांच्या तरंगांत तुझे भ्रूविलास,
— मला हवं आहे हे सगळं एका ठायी...
तेवढ्याला मात्र मी मुकलो आहे !
म्हणून रेखाटतो शिळेवर
तुझं... कलहान्तरितेचं... चित्र रंगमय धातूंनी
पण दुष्ट मत्सरी दैव
धुवून टाकतं ते माझ्या अश्रूंनी.





५२.

स्वप्नात जेव्हा तू भेटतेस,
पसरतो मी हात अंतराळात
तुला कडकडून मिठी मारण्यासाठी.
तेव्हा ढाळतात वनदेवता
झाडांच्या कोवळ्या पानांवर आसवांचे मोती.
हिमालयावरच्या देवदारूंची पालवी चुंबून
जेव्हा वाहतात दक्षिणाभिमुख थंड वारे
तेव्हा मोहरतो मी त्यांना मिठी मारत.
ते तुला स्पर्श करून आलेले असणार ना !
ही दीर्घ दीर्घ रात्र केव्हा होईल क्षणाएवढी ?
केव्हा मंदावेल हर प्रहरींचे ऊन्ह ?
मनोरथ, नुसते मनोरथ करायचे...

५३.

लाडके, मी सावरतो मला
माझ्या अगणित मनोरथांनी.
तूही धीर सोडू नकोस माझ्या गोड पोरी.
कोणाला मिळतं सतत सुख...
किंवा एकसारखं दुःखच दुःख ?
माणसाचं भाग्यचक्र
कधी खाली जातं, कधी वर.
आता फक्त चार महिने उरले आहेत
शापाचा काळ संपायला.
तू मन घट्ट कर...
मग पुरे करू आपण वियोगातले मनोरथ
शरदाच्या टिपूर चांदण्या रात्रीं.





५४.

आठवतं तुला —
मागं एकदा तू झोपली होतीस मला मिठी मारून
अन् अचानक जागी झालीस रडत रडत...
मी तुला पुन्हा पुन्हा कारण विचारल्यावर
खुसूखुसू हसत म्हणालीस
'लब्बाड! मी तुला पाहिलं स्वप्नात
कोणा दुसरीशीच प्रेमाचे रंग खेळताना !'
ही तुझ्या-माझ्यांतली खूण ऐकल्यावर
पटेल ना तुला मी खरंच सुखरूप आहे ?
नको धरूस भलत्या शंका.
लवकरच अनुभवशील, खचित अनुभवशील
विरहानंतरची उत्कट प्रीती.'

५५.

पहिल्याच विरहानं पोळलेल्या तुझ्या सखीला
मित्रा, देशील ना आश्वासनानं धीर ?
फीर परत नंतर कैलासाहून
आण तिचीही कुशल वार्ता
अशाच आतल्या कुपीतल्या गुपितासह.
व्रतच आहे तुझं
चातकांची तहान मिटवण्याचं.
माझ्या मैत्रीसाठी म्हण की करुणाबुद्धीनं
पण एवढं माझं प्रिय तू अवश्य करच.
मग हवं तिथे फीर वर्षेनं दिलेल्या वैभवानिशी.
मितवा रे ! कधीच अगदी कधीच, क्षणभरही न होवो
तुझी तुझ्या विद्युल्लतेपासून ताटातूट !



संवेदनाशील मनाला कायम झपाटून टाकण्याची शक्ती कालिदासाच्या मेघदूतात आहे. जेमतेम १२५ श्लोकांचे हे काव्य दीर्घदीर्घ महाकाव्यांइतकेच हृदयंगम आहे. 'मेघेऽस्माकं गतं वयः' असा सानंद कबुलीजबाब देणारी रसिक माणसे पुष्कळ आहेत. मेघदूत प्रेमिकांचा एक असंघटित क्लबच आहे ! अलौकिक कल्पनाशक्ती, भावनांची स्पंदने आणि चित्रदर्शी शैली यांचा मेघदूतात त्रिवेणीसंगम आहे. 'मेघ-हृदय' हा अनुवाद नाही, सारांश नाही, स्वैर रूपांतर नाही, पुनर्निर्माण नाही, काही नाही. 'तुका म्हणे झाले काहीचिया बाही', एवढेच खरे. मूळ मेघदूताला उराउरीं भेटून मिळणाऱ्या अनिर्वचनीय आनंदाची कल्पना, तसे भेटणे अशक्य असलेल्या सहृदय आस्वादकांना मिळावी एवढीच माफक आकांक्षा मनात बाळगून केलेला हा प्रयत्न. तो सर्वांना रुचेल अशी आशा आहे.

वसंत बापट

काव्य
REFBK-0025755

